## आपत्काळात मानवजातीच्या जीवितरक्षणासाठी आणि सृष्टीच्या कल्याणासाठी कृतीशील असणारे जगाच्या पाठीवरील एकमेव द्रष्टे परात्पर गुरु डॉ. जयंत आठवले !

'हिरण्याक्ष नामक असुराने पृथ्वीला पळवून महासागरात लपवून ठेवले असता श्रीविष्णूने वराह अवतार घेऊन पृथ्वीचे रक्षण केले. सृष्टीचे संतुलन सदैव टिकून राहण्यासाठी भगवान शिव अखंड ध्यानावस्थेत राहतो. परात्पर गुरु डॉ. जयंत आठवले हेही अनेक दैवी गुणांनी युक्त असून ते देवतासमान असल्याच्या अनेक अनुभूती साधकांना आल्या आहेत. परात्पर गुरु डॉक्टरांनाही देवतांप्रमाणे अखिल मानवजातीच्या रक्षणाची आणि कल्याणाची, तसेच सृष्टीचीही काळजी आहे.

आपत्काळात पूर, भूकंप यांसारख्या नैसर्गिक आपत्ती आणि महायुद्धासारख्या मानव-निर्मित आपत्ती येणार आहेत. अखिल मानवजातीला या आपत्तींना समर्थपणे तोंड देता येण्यासाठी मार्गदर्शन मिळावे, यासाठी परात्पर गुरु डॉ. आठवले यांनी वर्ष २०१३ पासून 'आपत्काळातील संजीवनी' या ग्रंथमालिकेच्या निर्मितीला आरंभ केला. यामध्ये डॉक्टर, औषधे आदी नसतांना स्वतःच स्वतःवर उपचार करता येतील अशा विविध उपचारपद्धतींवरील ग्रंथ आहेत. या अंतर्गत 'प्राणशक्तीवहन उपाय' आणि 'रिकाम्या खोक्यांचे उपाय' या सोप्या आणि प्रभावी उपचारपद्धतींचा शोध परात्पर गुरु डॉक्टरांनी स्वतः लावला आहे. आश्चर्याची गोष्ट म्हणजे, परात्पर गुरु डॉक्टरांनी वर्ष १९८० पासूनच मुंबई येथील त्यांच्या घरी राहत असतांनाच्या काळात आयुर्वेद, बिंदूदाबन, रेकी यांसारख्या उपचारपद्धतींविषयीची शेकडो कात्रणे संग्रहित करून ठेवली होती. या कात्रणांचा उपयोगही आता ग्रंथ बनवण्यासाठी होत आहे. यातूनही परात्पर गुरु डॉक्टरांचे द्रष्टेपण विदित होते. आपत्काळात घरगुती औषधे सहजतेने उपलब्ध व्हावीत, यासाठी देश-विदेशांतील मानवांना त्यांच्या घराच्या आगाशीत, अंगणात अथवा घराजवळच्या

परिसरात सहजतेने लागवड करता येतील अशा औषधी वनस्पतींचा अभ्यास ते साधकांकडून करवून घेत असून या वनस्पती सर्वत्र लावल्या जाव्यात, याकडे लक्षही देत आहेत. त्यांनी औषधी वनस्पतींच्या लागवडीविषयीचे ग्रंथही सिद्ध करवून घेतले आहेत.

आपत्काळात मानवाला जीवित राहण्यासाठी केवळ उपचारपद्धतींची माहिती असणे पुरेसे नसते, तर अन्न-धान्य, पाणी, इंधन, वीज यांसारख्या अनेक जीवनावश्यक गोष्टींची मानवाला नितांत आवश्यकता असते. हे सर्व लक्षात घेऊन आपत्काळाला तोंड देता येण्यासाठी सर्वांनी शारीरिक स्तरावर; इतकेच नव्हे, तर मानसिक, कौटुंबिक, आर्थिक आणि आध्यात्मिक स्तरांवरही पूर्वसिद्धता करणे आवश्यक असते. या दृष्टीने 'प्रत्येकाने व्यक्तीगतरित्या, तसेच समाजबांधवांनी एकत्रितपणे मिळून काय करायला हवे', हे सांगणारे परात्पर गुरु डॉक्टर हे एकमेवच होत. त्यांनी 'आपत्काळात जिवंत राहण्यासाठी करायची सिद्धता' या विषयावरील लेख नियतकालिके अन् संकेतस्थळे यांवर प्रसिद्ध केले असून याविषयीची ग्रंथमालिकाही प्रसिद्ध होत आहे.

आपत्काळात रक्षण होण्यासाठी व्यक्तीने स्वतःच्या बळावर सिद्धता कितीही केली, तरी भूकंप, त्सुनामी यांसारख्या महाभीषण आपत्तींतून वाचण्यासाठी शेवटी सारा भरवसा देवावरच ठेवावा लागतो. व्यक्तीने साधना करून देवाची कृपा प्राप्त केली, तर देव व्यक्तीचे कोणत्याही संकटात रक्षण करतोच. भक्त प्रल्हाद, पांडव यांसारख्या अनेक उदाहरणांवरून हे सिद्ध झाले आहे. यासाठीच परात्पर गुरु डॉक्टर काही वर्षांपासून ग्रंथ, नियतकालिके, संकेतस्थळे आदींच्या माध्यमातून अखिल मानवजातीला कळकळीने सांगत आहेत, 'आता जिवंत राहण्यासाठी तरी साधना करा !'

'धर्माचरणाचा ऱ्हास होऊन अधर्म बळावला की, पृथ्वीवर संकटे येतात', असे हिंदु धर्मशास्त्र सांगते. समाज धर्माचरणी आणि साधक बनला, तसेच सामाजिक आणि राष्ट्रीय जीवनात धर्माचे अधिष्ठान असले की,

पृथ्वीवर संकटे येत नाहीत आणि सृष्टीचे संतुलन स्थिर राहण्यासही साहाय्य होते. यासाठीच परात्पर गुरु डॉक्टर केवळ भारतातच नव्हे, तर संपूर्ण पृथ्वीवर धर्माचे अधिष्ठान असलेले 'ईश्वरी राज्य' स्थापन करण्यासाठी आध्यात्मिक स्तरावर मार्गदर्शन करत असून त्यासाठी संत, संप्रदाय, साधक, हिंदुत्ववादी, धर्मप्रेमी आणि राष्ट्रभक्त यांचे संघटनही करत आहेत.

गेल्या काही वर्षांपासून परात्पर गुरु डॉक्टरांची प्राणशक्ती अत्यंत न्यून असून, म्हणजे जेमतेम जिवंत राहण्याइतपतच असून त्यांना अनेक शारीरिक त्रासही होत आहेत. ते स्वतः ब्रह्मलीन अवस्थेत असून मनात आणले, तर कधीही सानंद देहत्याग करू शकतात. असे असतांनाही ते केवळ अखिल मानवाचे आपत्काळापासून रक्षण व्हावे आणि अखिल मानवजात सात्त्विक बनून सर्वत्र ईश्वरी राज्य यावे अन् सकल सृष्टीचे कल्याण व्हावे, यांसाठी प्रतिदिन अक्षरशः देहातील प्राण एकवटून १५ - १६ घंटे कार्यरत असतात !

अशा धर्मसंस्थापक, जगतोद्धारक, सृष्टीचे पालनहार आणि युगप्रवर्तक परम कृपाळू गुरुमाउलीच्या चरणी शिरसाष्टांग नमन !'

**- (पू.) श्री. संदीप आळशी (११.११.२०१९)** F (SStSA-L + PR 28AAp + DrK-PR 28AAp)


परिपूर्ण अध्यात्मशास्त्र शिकवणारी

# सनातन संस्था

- सत्संग, संस्कारवर्ग इत्यादींद्वारे धर्मशिक्षण
- 'टी.व्ही.'वरील चर्चासत्रांद्वारे जागृती
- ऑगस्ट २०२० पर्यंत १०८ साधकांना संतपद
- राष्ट्र, धर्म, साधना, आयुर्वेद इत्यादींविषयीचे ग्रंथ



अवश्य भेट द्या : Sanatan.org ✆ ९३२२३१५३१७

## ‘आपत्काळातील जीवितरक्षण’ या ग्रंथमालिकेचे सामाईक मनोगत

**१. ‘कोरोना’ विषाणूरूपी आपत्ती म्हणजे, महाभीषण आपत्काळाची लहानशी झलक ! :** फेब्रुवारी २०२० पासून ‘कोरोना’ विषाणूने जगभरात हाहाःकार माजवला आहे. ‘कोरोना’ विषाणूच्या संसर्गामुळे ६ सप्टेंबर २०२० पर्यंत संपूर्ण जगभरात ८ लक्ष ८४ सहस्र ३२७ जण मृत्यूमुखी पडले, तर २ कोटी ७० लक्ष ९६ सहस्र ३२६ जण रुग्ण आहेत. ‘कोरोना’च्या आपत्तीत अन्नधान्य, पाणी, वीज इत्यादी जीवनावश्यक गोष्टींचा तुटवडा नाही. लोकांच्या हाताशी मोबाईल, इंटरनेट, टी.व्ही. इत्यादी सुखसुविधा देणारी साधनेही आहेत. केवळ दळणवळण बंदीचे पालन करावे लागल्यामुळे उद्योगधंद्यांवर विपरित परिणाम होणे अन् त्यामुळे देशात आर्थिक मंदी येणे, नागरिक देशांत आणि विदेशांत ठिकठिकाणी अडकून पडणे यांसारख्या समस्या उद्‌भवल्या आहेत. मात्र बहुसंख्य जणांना घरात बसून रहाण्यावाचून विशेष काही समस्यांना तोंड द्यावे लागत नाही. असे असतांनाही ‘कोरोना’च्या संकटाला कंटाळून आत्महत्या करणे, मद्य न मिळाल्याने अनेक मद्यपी रस्त्यावर उतरणे, अनेकांनी ‘कोरोना’पासून रक्षण होण्यासाठीचे शासकीय नियम न पाळणे इत्यादी चित्रेही पहायला मिळत आहे. जनतेला धर्मशिक्षण न दिल्याने आणि साधना न शिकवल्याने जनतेची स्थिती किती दुर्दैवी झाली आहे, हे यातून लक्षात येते.

**२. महाभीषण आपत्काळाचे थोडक्यात स्वरूप :** महायुद्ध, भूकंप, महापूर इत्यादींच्या स्वरूपातील महाभीषण आपत्काळ तर अजून यायचाच आहे. ‘तो येणार’, हे निश्चित असल्याचे अनेक नाडीभविष्य सांगणारे आणि द्रष्टे साधू-संत यांनी पूर्वीच सांगून ठेवले आहे. त्या संकटाचे पडघमही आता वाजू लागले आहेत. ‘कोरोना’ विषाणूची आपत्ती चीनमुळेच उद्‌भवली आहे’, असे सांगत अमेरिकेसह काही युरोपीय देशांनी चीनविरुद्ध दंड थोपटायला आरंभ केला आहे. थोडक्यात महायुद्ध आता निकट येत आहे. हा भीषण आपत्काळ काही दिवसांचा वा मासांचा

नसून तो वर्ष २०२३ पर्यंत, म्हणजे आतापासून (वर्ष २०२० पासून) तीन वर्षांचा, अर्थात् भारतात 'हिंदु राष्ट्रा'ची (आदर्श अशा ईश्वरी राज्याची) स्थापना होईपर्यंत असेल.

**३. आपत्काळात जिवंत रहाण्यासाठी विविध पूर्वसिद्धता करणे आवश्यक :** आपत्काळात वीजपुरवठा बंद पडतो. पेट्रोल, डीझेल आदींचा तुटवडा निर्माण झाल्याने वाहतूक-व्यवस्था कोलमडून पडते. त्यामुळे शासनयंत्रणा सर्वत्र साहाय्यासाठी पोचू शकत नाही. शासन करत असलेल्या साहाय्यकार्यात अडथळेही येतात. त्यामुळे स्वयंपाकाचा 'गॅस', खाण्या-पिण्याच्या वस्तू आदी अनेक मास (महिने) मिळत नाहीत वा मिळाल्या तरी त्यांचे 'रेशनिंग' होते. डॉक्टर, वैद्य, औषधे, रुग्णालये आदी सहजपणे उपलब्ध होणे कठीण असते. हे सर्व लक्षात घेऊन या आपत्काळाला तोंड देता येण्यासाठी सर्वांनी शारीरिक, मानसिक, कौटुंबिक, आर्थिक, आध्यात्मिक इत्यादी स्तरांवर पूर्वसिद्धता करणे आवश्यक बनले आहे. प्रस्तुत ग्रंथमालिकेच्या पहिल्या खंडात शारीरिक स्तरावरील, तर दुसऱ्या खंडात उर्वरित पूर्वसिद्धतांविषयी सांगितले आहे.

अन्न, पाणी, वीज अशा दैनंदिन स्तरावरील सिद्धतांविषयी विवेचन करतांना एकाच विषयासंबंधाने विविध प्रकारच्या सिद्धता सांगितल्या आहेत. प्रत्येकाने स्वतःची आवश्यकता, जागेची उपलब्धता, आर्थिक परिस्थिती, आपण रहात असलेल्या ठिकाणचे हवामान आणि भौगोलिक स्थिती इत्यादींचा विचार करून स्वतःला सोयीस्कर अशा सिद्धता कराव्यात. जेथे सिद्धतांच्या संदर्भात कृतीच्या स्तरावर सांगण्याला मर्यादा येते, तेथे केवळ निर्देश केला आहे, उदा. 'आपत्काळात पाण्याची चणचण भासू नये यासाठी विहीर खोदावी', असे सांगितले आहे; पण त्यासाठी 'नेमके काय काय करावे लागते', हे सांगितले नाही. अशा कृतींविषयी वाचकांनी जाणकारांना विचारावे किंवा त्यासंबंधीचे संदर्भग्रंथ पहावेत.

**४. प्रत्यक्ष आपत्काळाला सामोरे जाण्यासाठीही सिद्धता करा ! :** प्रत्यक्ष पूर, भूकंप, युद्ध यांसारख्या आपत्ती उद्भवल्यावर जीवितरक्षणासाठी

आणि त्या आपत्तींना सामोरे जाण्यासाठी करायच्या कृती, मनाने स्थिर रहाता येण्यासाठी करायचे मानसिक स्तरावरील उपाय, आपत्तींच्या निवारणासाठी करायचे नामजप-उपाय इत्यादींविषयी समजून घेणेही आवश्यक आहे.

**५. वाचकांनो, सिद्धतांना शीघ्र आरंभ करा ! :** वाचकांनी ग्रंथमालिकेनुसार आतापासूनच कार्यवाहीला आरंभ केल्यास त्यांना आपत्काळ सुसह्य वाटू शकेल. वाचकांनी या विषयाच्या संदर्भात समाजबांधवांमध्येही जागृती करावी.

**६. प्रार्थना :** ‘आपत्काळात केवळ तग धरून रहाण्यासाठीच नव्हे, तर जीवनात साधनेचा दृष्टीकोन अंगिकारून आनंदी रहाण्यासाठीही या ग्रंथमालिकेचा उपयोग व्हावा’, ही श्री गुरुचरणी प्रार्थना !

**– संकलक**

**वाचकांना विनंती !**

ग्रंथमालिकेतील विविध विषयांच्या अनुषंगाने आणखी काही उपयुक्त सूत्रे लक्षात आली, तर ती कृपया प्रकाशकाच्या पत्त्यावर संगणकीय पत्राद्वारे (‘ई-मेल’ने) किंवा टपालाने कळवावीत.

**टीप :** ग्रंथात काही सूत्रांच्या शेवटी मराठी किंवा इंग्रजी संकेतांक केवळ कार्यालयीन सोयीसाठी दिले आहेत.

सनातनच्या ग्रंथांच्या ‘ऑनलाईन’ खरेदीसाठी

**SanatanShop.com**

मराठी, हिंदी, गुजराती, इंग्रजी, कन्नड, तेलुगु,
तमिळ आणि मल्ल्याळम् या भाषांतील ग्रंथ उपलब्ध !




* काही नियम आणि अटी लागू

# अनुक्रमणिका

| | | |
|---|---|---|
| १. | ‘आपत्काळ’ या शब्दाचा अर्थ | १५ |
| २. | भीषण आपत्काळाविषयी द्रष्टे, संत, परात्पर गुरु डॉ. जयंत आठवले, महर्षि आणि देवता यांनी वर्तवलेली भाकिते ! | १५ |
| ३. | आपत्काळाविषयीच्या भाकितांकडे दुर्लक्ष करण्याची चूक करू नका ! | १७ |
| ४. | आपत्काळाची तीव्रता पुष्कळ असण्याचा कालावधी | १७ |
| ५. | आपत्काळाला काही प्रमाणात आरंभ झाला असल्याचे दर्शवणाऱ्या काही नैसर्गिक आपत्ती आणि आंतरराष्ट्रीय घडामोडी | १८ |
| ६. | ‘आपत्काळात परिस्थिती कशी भयावह असते’, हे दर्शवणारी काही उदाहरणे | १९ |
| ७. | आपत्काळात शासनावर विसंबून राहण्याची चूक न करता प्रत्येकाने विविध स्तरांवर सिद्ध राहणे आवश्यक ! | २२ |
| ८. | आपत्काळात ‘जसे व्हायचे असेल, तसे होईल’, अशी मानसिकता नको ! | २२ |
| ९. | आपत्काळात अन्नावाचून उपासमार न होण्यासाठी हे करावे ! | २३ |
| १०. | पाण्यावाचून हाल होऊ नयेत, यासाठी हे करावे ! | ४७ |
| ११. | विद्युत् मंडळाकडून होणारा वीजपुरवठा खंडित झाल्यास होणारी अडचण (गैरसोय) टाळण्यासाठी या पर्यायांचा विचार करावा ! | ५३ |
| १२. | पेट्रोलसारखी इंधने किंवा वीज नसतांना प्रवासाची सोय होण्यासाठी करायच्या पूर्वसिद्धता | ५५ |
| १३. | कुटुंबासाठी लागणाऱ्या नित्योपयोगी वस्तूंची, तसेच वेळप्रसंगी लागणाऱ्या वस्तूंची खरेदी आतापासूनच करावी ! | ५९ |
| १४. | विविध नित्योपयोगी वस्तूंना असणाऱ्या पर्यायांचा विचार करून ठेवणे | ६६ |

१५. डॉक्टर, वैद्य, रुग्णालये आदींची होणारी अनुपलब्धता लक्षात घेऊन आरोग्याच्या दृष्टीने करायच्या पूर्वसिद्धता ७४
१६. कुटुंबातील एकाने तरी 'प्रथमोपचार प्रशिक्षण' घेणे ७६
१७. कुटुंबातील एकाने तरी 'अग्नीशमन प्रशिक्षण' घेणे ७६
१८. दंगलखोर, गुंड इत्यादींपासून स्वतःचे आणि कुटुंबियांचे रक्षण करता यावे, यासाठी 'स्वसंरक्षण प्रशिक्षण' घेणे ७७
१९. आपत्काळाच्या दृष्टीने करायच्या अन्य सिद्धता ७७
२०. नेपाळ येथील धर्मप्रेमी सौ. सानु तामाङ्ग यांची देवाने प्रतिकूल परिस्थिती उद्भवण्यापूर्वीच करून घेतलेली सिद्धता आणि त्यांनी केलेले प्रयत्न ७८

## सनातनचे चैतन्यदायी आणि अनमोल ग्रंथ !

### आचारपालन शिकवणारे ग्रंथ

- आचारधर्माचे प्रास्ताविक
- अलंकारशास्त्र (५ खंड)
- आदर्श दिनचर्या (२ खंड)
- स्त्रियांनी अलंकार घालण्याचे शास्त्र (लघुग्रंथ)
- केसांची निगा अन् रचना (५ खंड)
- आहाराशी संबंधित आचार (८ खंड)
- वेशभूषेविषयीचे शास्त्र (४ खंड)
- शांत निद्रेसाठी काय करावे ?

### अन्य विषयांवरील ग्रंथमालिका

- धर्म, धर्माचरण, देवतांची उपासना आणि साधना (९८ खंड)
- धार्मिक आणि सामाजिक कृती (१३ खंड)
- सुगम अध्यात्मशास्त्र (५ खंड)
- स्वभावदोष-निर्मूलन आणि संमोहन (११ खंड)
- बालसंस्कार (८ खंड)
- स्वभाषारक्षण व राष्ट्ररक्षण (१७ खंड)
- आदर्श राष्ट्ररचना व धर्मरक्षण (२८ खंड)
- दृष्ट आणि उतारा काढणे (४ खंड)
- दैवी कण (४ खंड)
- संतांची चरित्रे व शिकवण (१४ खंड)
- प.पू. डॉ. आठवले यांची वैशिष्ट्ये (८ खंड)
- ईश्वरप्राप्तीसाठी कला (७ खंड)
- आयुर्वेद, तसेच मुलांचे संगोपन (४८ खंड)